


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : २९६ वा    शनिवार दि ०७ फेब्रुवारी २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये




# भाजप की शिवसेना...मुंबईचा महापौर कोणत्या पक्षाचा होणार?

## होणार फैसला, असं आहे समीकरण

वृत्तसंस्था/मुंबई

मुंबईचा महापौर कोण यावरील चर्चेला आज, शनिवारी विराम मिळणार आहे. महापौर आणि उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन अर्ज भरण्याची मुदत ७ फेब्रुवारी असून भाजप-शिवसेना महायुतीकडून अर्ज सादर केले जाणार आहेत. यावेळी सर्व नगरसेवक उपस्थित राहून शक्तिप्रदर्शन करणार आहेत. शिवसेना उबाठा आणि काँग्रेसकडूनही महापौर-उपमहापौर पदासाठी उमेदवार दिले जाण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिका निवडणुकीनंतर महापौर कोणाचा होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महायुतीकडून यावर शिक्कामोर्तब झालेले नाही. मात्र, शनिवारी महापौर-उप महापौरपदाचे उमेदवार स्पष्ट होतील. भाजप आणि शिवसेनेकडून स्थायी समिती अध्यक्ष, सुधार समिती, शिक्षण समिती, बेस्ट समितीसह अन्य समितीवरील अध्यक्षपद मिळवण्यासाठी चढाओढ लागली आहे. भाजप आणि शिवसेनेने स्वतंत्र गटनोंदणी केली आहे. तर राष्ट्रवादी



काँग्रेसची गटनोंदणी झाली असून शिवसेनेला पाठिंबा म्हणून केला जाणारा सहयोगी गट स्थापन होण्याची प्रतीक्षा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (श. प) यांनीही शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे नगरसेवक संख्याबळ जास्त असल्याने महापौरपदासाठी ११ फ

ेब्रुवारीला महापालिका मुख्यालयात होणाऱ्या निवडणुकीत महायुतीचा मार्ग तसा सोपा आहे. मात्र, शिवसेना (उबाठा) पक्ष आणि काँग्रेसकडूनही उमेदवार दिला जाण्याची शक्यता आहे. २४ नगरसेवक निवडून आलेली काँग्रेसही महापौर-उपमहापौरपदसाठी उमेदवार देण्याच्या तयारीत आहे. मात्र हे सर्व चित्र शनिवारीच स्पष्ट होणार आहे. महापालिका निवडणुकीत निवडून आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या एकमेव नगरसेवकाने ठाकरेंच्या पक्षाची साथ सोडत शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेना उबाठा पक्षाचे ६५, मनसेचे सहा, समाजवादी पार्टीचे दोन नगरसेवक, काँग्रेसचे २४ नगरसेवक निवडून आले आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) अजित रावराणे हे एकमेव नगरसेवक आहेत. दिंडोशी प्रभाग क्रमांक ४३ मधून निवडून आलेले अजित रावराणे यांनी नुकतीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांची विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाल्याचे समजते. या चर्चेनंतर रावराणे यांनी महायुतीच्या गोटात सामील होण्याचा निर्णय घेतला.

# दिल्लीत हायव्होल्टेज बैठका, काँग्रेसमधील अंतर्गत कलहावर मंथन अन् विजय वडेट्टीवार माध्यमांसमोर...

वृत्तसंस्था/ चंद्रपूर

चंद्रपूर महापालिका निवडणुकीत काँग्रेसला सर्वाधिक २७ जागांवर विजय मिळाला असला तरी बहुमताचा आकडा गाठता आला नाही. विशेष म्हणजे निवडणुकीनंतर चंद्रपूर काँग्रेसमध्ये अभूतपूर्व घडामोडी बघायला मिळाल्या. काँग्रेसचे दोन मोठ्या नेत्यांमध्ये शितयुद्ध बघायला मिळाले. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या समर्थक नगरसेवकांचा गट आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या समर्थक नगरसेवकांचा गट वेगवेगळ्या हॉटेलमध्ये हलवण्यात आले. स्थानिक पातळीवर वाद मिटत नसल्याने अखेर काँग्रेसच्या दिल्ली दरबारी या विषयावर मंथन झालं. अखेर काँग्रेसच्या दिल्ली हायकमांडने यावर तोडगा काढला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज माध्यमांसमोर येत, नेमका काय तोडगा काढण्यात आला, याची सविस्तर माहिती दिली. आमचे विदर्भाचे प्रभारी, मध्य प्रदेशचे माजी आमदार कुणाल चौधरी यांच्या उपस्थितीत प्रदेशने आणि दिल्लीच्या हायकमांडने निर्णय घेतला की, गटनेता राजेश अडूर आणि प्रतिभा धानोरकर म्हणतील त्याला महापौर करु. त्यामुळे आज आमच्याकडून कुणीही महापौर पदाचा अर्ज भरलेला नाही. प्रतिभा धानोरकर यांच्याकडून चार महिलांनी महापौर पदाचा अर्ज भरला आहे. उपमहापौर पदी वसंतराव देशमुख यांचा अर्ज गेलेला आहे, अशी माहिती विजय वडेट्टीवार यांनी दिली. आमच्या हायकमांडच्या निर्देशांनुसार, राजेश अडूर यांची गटनेतेपदी निवड झाली आहे. तसं पत्र प्रदेश काँग्रेस कमिटीने विभागीय आयुक्तांना पाठवलं आहे. मेलही केलं आहे. हे सर्व काम आमचे प्रभारी कुणाल चौधरी यांच्या देखरेखेखाली होत आहे. आज पाच वाजेचा वेळ आयुक्तांनी दिलेला आहे. सर्व २७ नगरसेवक काँग्रेसचा गट तयार करण्यासाठी एकत्र येतील आणि उपस्थित राहतील आणि गट निर्माण करतील, असा निर्णय हायकमांडने घेतला आहे. त्यामुळे आता कुठलीही वादाची किंवा संभ्रमाची परिस्थिती शिल्लक राहिलेली नाही, असं माझं मत आह असं वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं.



आता काही घाई करुन उपयोग नाही. सध्या महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज केला जात आहे. १० तारखेला निवडणूक आहे. जनसुराज पार्टी काँग्रेससोबत आहे. त्यांनी अर्ज भरला असेल तरी ते अर्ज मागे घेतील. दुसरा उबाठाने फॉर्म भरला आहे. त्यांच्यासोबत चर्चा करुन मार्ग काढला जाईल. त्यांच्याबरोबर आम्ही चर्चा करतो आहोत. त्यामुळे अडचण येईल, अशी परिस्थिती नाही असंही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मुंबई पुणे एक्सप्रेस मार्गावर आडोशी घाटात




तारीख ३ फेब्रुवारी वार मंगळवार वेळ संध्याकाळी ५ ची ! ह्या वेळी मुंबई पुणे एक्सप्रेस मार्गावर आडोशी घाटात प्रोपेलिन गॅस चा टँकर उलटला आणि एकच खळबळ उडाली ! महामार्ग पोलिसांना ही बातमी कळताच त्यांनी तात्काळ मुंबईकडे जाणारी लेन बंद केली आणि इथूनच मोठ्या ट्रॅफिक जॅम ला सुरुवात झाली ! टँकर तर उलटला आहे काय त्याला ? क्रेन ने उचला आणि मोकळा करा रस्ता ! अशा प्रतिक्रिया येत होत्या पण अश्या प्रतिक्रिया देणाऱ्या लोकांना विषयाचे गांभीर्य माहिती नव्हते ! तेच सांगण्याचा हा खटाटोप ! सामान्य लोकांना रस्त्यावरून फिरणारे पेट्रोल टँकर माहिती आहेत परंतु परवा जो उलटला तो प्रोपेलिन गॅस टँकर होता ! पेट्रोल चा टँकर उलटला तर तो क्लिअर करणे तुलनेने सोपे असते कारण पेट्रोल डोळ्यांना दिसते पेट्रोल जास्त पसरत नाही आणि पेट्रोल चां वास देखील येतो ! परंतु प्रोपेलिन मध्ये पूर्ण उलटे गणित असते ! प्रोपेलिन गॅस दिसत नाही तो बेमालूमपणे हवेत मिक्स होतो ! मिक्स झालेला हा गॅस वाऱ्या सोबत सर्वदूर पसरतो ! आणि सगळ्यात मुख्य म्हणजे ह्या गॅस ला वास नसतो ! थोडक्यात प्रोपेलिन गॅस लीक म्हणजे अदृश्य बॉम्ब असतो !! स्वेटर घालून खुर्ची वर बसल्यावर आणि अचानक उठल्यावर छोटासा स्टॅटिक करंट चां शॉक आपण प्रत्येकानेच खाल्ला असेल ! बास एवढा छोटासा स्टॅटिक चार्ज देखील प्रोपेलिन गॅस चा भडका उडवायला खूप झाला ! त्यामुळेच घटनास्थळी क्रेन उपलब्ध असताना देखील क्रेन ने टँकर हटवला गेला नव्हता ! कारण जरा जरी घर्षण झाले असते तर होत्याचे नव्हते झाले असते ! आता कडे एकच पर्याय होता तो म्हणजे नवीन गॅस टँकर आणणे, पडलेल्या गॅस टँकर ची गळती बंद करणे आणि त्यात उरलेला गॅस ट्रान्स्फर करणे ! आता जो रिकामा गॅस टँकर पाहिजे तो पण प्रोपोलिन गॅस नेऊ शकणारा म्हणजेच तसे मानके असणारा पाहिजे होता त्यानंतर ज्या कंपनीचे ते टँकर होते तेथील एक्सपर्ट देखील बोलवावे लागले ! मधल्या काळात ट्रॅफिक ची पर्यायी व्यवस्था करावी लागली , बघ्यांची गर्दी बाजूला करून सेफ झोन बनवावा लागला, फायर ब्रिगेड ला स्टॅण्डबाय वर ठेवावे लागले ! ची टीम बोलवावी लागली ! रात्र झाल्याने धोका आणखीन वाढला ! बोगद्याच्या शेजारी.टँकर असल्याने बोगदाच एक मोठा सिलेंडर बनला ! कारण बोगद्याच्या दुसऱ्या टोकाला जरी एखादा स्पार्क झाला असता तरी गॅस ने पेट घेतला असता आणि किमान ५ किलोमीटर चां परिसर धमाक्याने उडाला असता! एवढा भयंकर डिझास्टर टाळण्यासाठी प्रशासनाणे रात्रीचा दिवस केला आणि महत्प्रयासाने गॅस ट्रान्स्फर केला ! जरी सगळे काम झाले असले तरी अजून एक धोका.होता तो म्हणजे एवढ्या वेळात हवेत मिक्स झालेला.गॅस ! त्यामुळे गॅस चे मीटर घेऊन हवेची गुणवत्ता सतत तपासावी लागली ! समजा घाई घाईत ट्रॅफिक मोकळे केले असते तर वातावरणात जमा झालेला गॅस पेटून पुन्हा स्फोट होण्याची शक्यता होती ! त्यामुळे जेव्हा काही तासांनी हवेची गुणवत्ता सुधारली तेव्हाच टँकर उचलण्यात आला आणि मग रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला गेला! ट्रॅफिक जॅम मोठा झाला त्याची बातमी झाली पण प्रशासनाने अथक परिश्रमातून खूप मोठी दुर्घटना टाळली ही खरी मोठी बातमी आहे ! ह्या भीम पराक्रमासाठी महामार्ग पोलिस, चे जवान, आपत्ती व्यवस्थापन मंत्रालय, गॅस कंपनीचे कर्मचारी, क्रेन वाले, फायर फायटर, अशा अनेक निनावी कर्मचाऱ्यांचे ,माणसांचे आभार मानावे तेव्हढे कमीच




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# शिवसेना मंत्र्यांची एमआयएम आमदाराशी हॉटेलात बैठक, उपमहापौरपदासाठी पाठिंबा देण्याचे संकेत




**मालेगाव :** महापालिकेच्या महापौर-उपम हापौर पदाची निवडणूक उद्या शनिवारी (दि. ७) होत आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. गुरुवारी (दि. ५) एमआयएमचे आमदार मौलाना मुफ्ती मो. इस्माईल व माजी महापौर, एमआयएमचे गटनेते अब्दुल मलिक यांनी शिवसेनेचे नेते व राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांची त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात भेट घेतली. या भेटीत महापौर-उपमहापौर निवडीची रणनीती निश्चित करण्यात आल्याचा अंदाज आहे. मात्र, याबाबत शिवसेना व एमआयएमच्या नेत्यांनी मौन बाळगले आहे. कट्टर मुस्लिम एमआयएम पक्ष व हिंदुत्ववादी शिवसेना पक्ष महापौर व उपमहापौर निवडणुकीत एकत्रित येण्याची चिन्हे दिसत आहेत.एमआयएमने महापौरपदाच्या निवडणुकीत माघार घेतली असली, तरी उपमहापौरपदासाठी आम दार पुत्र हाफिज अब्दुल्ला यांना रिंगणात उतरवले आहे. महापौर व उपमहापौर निवडणुकीची रणनीती ठरवण्यासाठी एम आयएमच्या नगरसेवकांची मुंबई-आग्रा महामार्गालगतच्या पाटणे शिवारातील एका हॉटेलवर गुरुवारी (दि.५) गुप्त बैठक पार पडली.या बैठकीत शिवसेनेच्या म हापौरपदाच्या उमेदवार लता घोडके यांना पाठिंबा द्यायचा की नाही, यावर खलबते झाली. दरम्यान, शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी 'एमआयएम'चे नगरसेवक व मौलाना मुफ्ती यांच्या संपर्कात आहेत.महापौर-उपमहापौर निवडणूक चुरशीची होणार असल्याचे राजकीय घडामोडींवरून दिसून येत आहे. मालेगाव सेक्युलर फ्रंटकडून महापौरपदासाठी नसरीन शेख व ताहेरा शेख, तसेच उपमहापौर पदासाठी शान -ए-हिंद यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर, एमआयएमने महापौरपदाच्या निवडणुकीतून माघार घेत उपमहापौरपदासाठी हाफिज अब्दुल्ला यांना उमेदवारी दिली आहे. महापौरपदासाठी शिवसेनेने लता घोडके, उपमहापौरपदासाठी नीलेश काकडे व नरेंद्र सोनवणे यांना रिंगणात उतरवले आहे.दुसरीकडे, जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीनिमित्ताने गेल्या काही दिवसापासून प्रचारसभा, कॉर्नर बैठकामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. प्रचाराच्या तोफा गुरुवारी सायंकाळी थंडावल्या असून शनिवारी मतदान होणार आहे. त्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून निवडणूक प्रक्रिया शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे.

## जमीन घोटाळ्यात पार्थ पवारांना क्लीन चिट? बावनकुळेंनी दिली अपडेट



**छत्रपती संभाजीनगर :** राजकीय वर्तुळात काही महिन्यांपूर्वी खळबळ उडवून देणाऱ्या पार्थ पवार यांच्याशी संबंधित कथित जमीन घोटाळ्याप्रकरणी सस्पेन्स आता अधिकच वाढला आहे. कारण पार्थ पवार यांना या प्रकरणात क्लीन चिट मिळाल्याची चर्चा असताना 'या प्रकरणाचा कोणताही अधिकृत अहवाल अद्याप सरकारकडे प्राप्त झालेला नाही,' असं सांगत भाजप नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे. या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या समितीला मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे पार्थ पवार यांना तूर्तास कोणतीही 'क्लीन चिट' मिळालेली नसून, चौकशीचा फेरा आता पुढील आठवड्यापर्यंत लांबणीवर पडला आहे.भाजप नेते मंत्री चंद्रशेखर बावनकुळे छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले, पार्थ पवार यांच्याशी संबंधित असलेल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या खारगे समि तीने सरकारकडे ७ दिवसांची अधिक वेळ मागितली होती. ही मागणी मान्य करण्यात आली असून, आता पुढील ८ दिवसांच्या आत अंतिम अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. 'अहवाल म इझ्याकडे आल्याशिवाय यावर भाष्य करणे उचित ठरणार नाही,' असे बावनकुळे यांनी नमूद केले. चौकशी समितीला मिळालेल्या या मुदतवाढीमुळे तपासात काही नवीन धागेदोरे हाती लागले आहेत का, अशा चर्चांना आता उधाण आले आहे.दुसरीकडे, या प्रकरणावरून महायुतीमध्ये सावधगिरीचे वातावरण पाहायला मिळत आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, अजित पवार यांच्या पक्षाबद्दल किंवा त्यांच्या नेत्यांबद्दल कोणतेही चुकीचे विधान करू नका. एकीकडे पार्थ पवारांची चौकशी सुरू असताना दुसरीकडे महायुतीचा धर्म पाळण्यासाठी भाजप नेत्यांकडून होणारी ही 'डॅमेज कंट्रोल'ची कसरत राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

## राष्ट्रवादी दक्ष, २ एप्रिलकडे लक्ष प्लान काय?

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. पक्षाची सुत्रेदेखील लवकरच त्यांच्याकडे जाण्याची दाट शक्यता आहे. विधिमंडळाच्या सदस्य झाल्यानंतर त्या राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देतील. त्यानंतर त्यांचे पुत्र पार्थ पवार राज्यसभेवर जातील, अशी दाट शक्यता आहे. पण पार्थ यांचं लक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या राज्यसभेच्या रिक्त जागेवर आहे.पार्थ पवार यांना आई सुनेत्रा पवार यांच्या जागी राज्यसभेचं सदस्य होण्यात रस नाही. सुनेत्रा पवार यांची राज्यसभेची टर्म २०२८ मध्ये संपत आहे. त्यामुळे पार्थ पवार यांना त्यांच्या मातोश्री रिक्त असलेल्या जागी निवडून जाण्यात स्वारस्य नाही. त्याऐवजी ते एप्रिल २०२६ मध्ये रिक्त होणाऱ्या जागांवर लक्ष ठेवून आहेत. त्यांचं लक्ष विशेषत: राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांच्या जागेकडे आहे. शरद पवार यांची राज्यसभेची टर्म २ एप्रिल २०२६ रोजी संपणार आहे.शरद पवार यांची टर्म संपल्यावर त्याच जागेवर निवडून गेल्यास ६ वर्षांची पूर्ण टर्म पार्थ पवार यांना मिळेल.

## संसदेत मोदींवर हल्ला करण्याचा कट होता ; भाजपचा गंभीर आरोप



**नवी दिल्ली :** लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भाषण करता आलं नाही. त्यावरुन आता राजकीय रणकंदन माजलं आहे. या सगळ्या घटनाक्रमावरुन भाजप खासदार मनोज तिवारी आणि कंगना रणौत यांनी विरोधकांवर गंभीर आरोप केले आहेत.मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देणार होते. तेव्हा काँग्रेसच्या खासदारांनी लोकसभेत पंतप्रधानांचा रस्ता पूर्णपणे रोखला. विरोधी पक्षाच्या खासदारांनी लोकसभेच्या अध्यक्षांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यांना पंतप्रधानांवरही हल्ला करायचा होता, असा सनसनाटी आरोप हिमाचल प्रदेशच्या मंडी मतदारसंघाच्या खासदार कंगना रणौत यांनी केला.पंतप्रधान मोदी जिथे बसतात, तिथे महिला खासदार जमल्या होत्या. त्यामुळे अशा वातावरणात, अशा परिस्थितीत पंतप्रधान मोदींनी भाषण केलं नाही. त्यांचा तो निर्णय योग्य होता,' असं खासदार रणौत म्हणाल्या. मंगळवारी संसदेत मोठा गदारोळ झाला. काँग्रेसच्या खासदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे सभागृहातील वातावरण चांगलंच तापलं होतं.दिल्लीचे खासदार मनोज तिवारी यांनीदेखील कंगना रणौत यांचीच री ओढली. 'त्यांनी (विरोधकांनी) पूर्णपणे घेराव घातला होता. त्यामुळेच तर पंतप्रधान आले नाहीत. त्यांच्या (विरोधकांच्या) ७ ते ८ महिला खासदार पुढे आल्या. जिथे पंतप्रधान बसतात, जिथून पंतप्रधान येतात, तो संपूर्ण भाग त्यांनी घेरला. त्यामुळे पंतप्रधानांना थांबावं लागलं,' असा आरोप मनोज तिवारी यांनी केला.

सुत्रांच्या माहितीनुसार, काँग्रेसचे खासदार मंगळवारी प्रचंड संतापले होते. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू दिलं जात नसल्यानं विरोधी बाकांवरील खासदार नाराज झाले होते. काँग्रेसच्या म हिला खासदारांनी पंतप्रधानांच्या खुर्चीला घेराव घातला.

# मनसेची शिवसेना शिंदे गटासोबत युती, चर्चांना उधाण




**नाशिक :** नाशिकमध्ये उद्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक पार पडणार आहे. याच पार्श्वभूमीवर आता नाशिकमध्ये राजकीय घडामोडींना वेग आला आहे. नाशिकमध्ये भाजपचे ७२ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे भाजपकडे महापौर-उपमहापौर पदासाठी एक हाती सत्ता आहे. यातच आज भाजपकडून खबरदारी म्हणून सर्व नगरसेवकांची अज्ञातस्थळी सहल काढण्यात आली आहे. कोणताही दगाफटका होऊ नये यासाठी भाजपकडून काळजी काळजी घेतली जात आहे. दुसरीकडे भाजपचा मित्रपक्ष असलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने नाशिकमध्ये आज मनसे सोबत युती करत नवीन गट स्थापन केला आहे. दरम्यान, नाशिकम ध्ये शिंदे गट आणि भाजप एकमेकांच्या विरोधात निवडूक लढले आहेत. नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) आणि मनसे पक्षाच्या नगरसेवकांचे संख्याबाळ जर पाहिलं तर शिंदे गटाकडे एकूण २६ नगरसेवक आहेत तर मनसेकडे १ नगरसेवक अशी संख्या आहे. शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांची युती होण्याची चर्चा असतानाच शिवसेना (शिंदे गट) आणि मनसेने नाशिकमध्ये युती करत शहर विकास आघाडी हा नवीन गट स्थापन केला आहे. त्यांच्या युतीमुळे नाशिकमध्ये राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आलं आहे.म हापालिकेतील समित्यांबाबतचे गणित यामुळे बिघडण्याची शक्यता आहे. इतर पक्षांच्या नगरसेवक संख्येचा विचार केला तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ४ नगरसेवक, उबाठा १५, काँग्रेस ३, अपक्ष १ अशी पक्षनिहाय नगरसेवकांची संख्या आहेशिवसेना ठाकरे गटासोबत म हापालिका निवडणुकीत लढलेल्या मनसेने महापौर निवडणुकीच्या काही तासांआधीच शिवसेना शिंदे गटासोबत हात मिळवणी केल्याने महापालिकेतील भाजपचे विविध समिती आणि स्थायी समितीच गणित कुठे तरी बिघडणार असल्याची चर्चा आहे.

या घडामोडींवर शिंदे गटाचे उपनेता तथा जिल्हा प्रमुख अजय बोरस्ते यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'मी मनसेचे जिल्हा अध्यक्ष अंकुश पवार यांच्या काही दिवस संपर्कात होतो,त्यांना विनंती केली होती आगामी कुंभमेळ्याच्या दृष्टीने आपण एकत्र यावे त्या गोष्टीला दाद देत मनसे एकत्र आली असून आपण त्यांचे स्वागत करतो.या संपूर्ण यांच्यात सिंहाचा वाटा असेल तो म्हणजे शिवसेनेचे सचिव नरेश म्हस्के यांचा असून, त्यांनी केलेल्या म ध्यस्थीमुळे ही यश लाभले आहे', अशी प्रतिक्रिया अजय बोरस्ते यांनी दिली.

# तळेगावात आईवरून शिवी दिल्याचा राग, तरुणाचं नको ते धक्कादायक कृत्य, पुणे हादरलं

**पिंपरी-चिंचवड :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात अनेकदा गुन्हेगारी घटना समोर येताना दिसत आहेत. आता तर अतिशय क्षुल्लक कारणावरुन झालेल्या वादातून एका तरुणाची हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. त्यामुळे अनेकांना धक्का बसला आहे. संबंधित घटना ही पिंपरी चिंचवडमध्ये घडली आहे. या घटनेनंतर नागरिकांकडून दु:ख व्यक्त केलं जात आहे. अनेक तरुणांमध्ये आता रागावर कोणतंही नियंत्रण राहिलेलं दिसत नाही. थोडाही संयम त्यांच्यात दिसत नाही, अशी चर्चा स्थानिकांमध्ये आहे. कारण तशी घटनाच पिंपरी चिंचवड शहरात घडली आहे. या घटनेनंतर पोलिसांनी आरोपी मरेकऱ्याला अटकदेखील केली आहे. पण या घटनेमुळे संपूर्ण शहर हादरलं आहे. सर्वसामान्य




नागरिकाचा सुरक्षेचा प्रश्न यामुळे ऐरणीवर आला आहे.पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील तळेगाव दाभाडे परिसरात किरकोळ कारणावरून एका तरुणाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी तळेगाव दाभाडे पोलिसांनी सनी चव्हाण या आरोपीला अटक केली आहे. संतोष पवार असं हत्या झालेल्या तरुणाचं नाव असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. ही घटना सायंकाळी साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष पवार आणि सनी चव्हाण हे दोघेही सोमाटणे फाटा परिसरात जुन्या पुणे-मुंबई महामार्गालगत असलेल्या मैदानात मुलं खेळत असलेला क्रिकेट सामना पाहत बसले होते. दोघेही एकाच कट्ट्यावर बसले होते. विशेष म्हणजे, हे दोघे एकमेकांना ओळखत नव्हते आणि पूर्णपणे अनोळखी होते.दरम्यान, किरकोळ कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. या वादादरम्यान मयत संतोष पवार याने आरोपी सनी चव्हाणला आईवरून शिवीगाळ केल्याने चव्हाण संतप्त झाला. रागाच्या भरात सनी चव्हाणने तिथेच असलेल्या दगडाने संतोष पवारच्या डोक्यावर जोरदार घाव घालून त्याची हत्या केली. घटनेची माहिती मिळताच तळेगाव दाभाडे पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आरोपी सनी चव्हाणला ताब्यात घेऊन अटक केली आहे.

संतोष पवार यांच्या हत्येमागे ठोस कारण अद्याप समोर आलेलं नसून, केवळ आईवरून शिवी दिल्याच्या रागातून ही हत्या झाल्याचं प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून, मृतदेह सवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तळेगाव दाभाडे पोलीस करत आहेत.

## लग्नाच्या आमिषाने विवाहितेवर तीन वर्ष अत्याचार, विरोध करताच..

**नवी मुंबई :** मोटार ट्रेनिंग स्कूल चालवणाऱ्या व्यक्तीने त्याच्याकडे ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या एका विवाहितेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार नवी मुंबईतील तळोजा भागात उघडकीस आला आहे. आरोपीच्या विरोधात बलात्कारासह धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून तळोजा पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.या प्रकरणात गुन्हा दाखल केलेल्या ३५ वर्षीय आरोपीचे नाव किरण पावशे असून तो नवी मुंबईतील तळोजा भागात राहतो. पीडित महिलाही याच भागात राहते. आरोपी किरण पावशे याचे तळोजा भागात मोटर ट्रेनिंग स्कूल असून जुलै २०२२ मध्ये पीडिता तिथे ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण घेण्यासाठी गेली होती. त्यावेळी आरोपीने तिच्याशी मैत्री करून तिला



लग्नाचे आमिष दाखवले.तसेच तिच्या पतीने तिला सोडून दिल्यास, तिचा सांभाळ करण्याचे आश्वासन देऊन मोटर ट्रेनिंग स्कूलमध्ये तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. तीन वर्षे हा प्रकार सुरू होता. पीडितेने आरोपीला विरोध केला असता, आरोपीने तिच्या मुलाला मारण्याची धमकी दिली, तसेच अश्लील भाषेत शिवीगाळ केली.यानंतर पीडितेने ४ फेब्रुवारी रोजी तळोजा पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल केला. आरोपीला अद्याप अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

दुसरीकडे, १९ वर्षीय युवतीला शेगाव येथे नेऊन लॉजवर बलात्कार केल्याची घटना २ फेब्रुवारीला घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध अँट्रॉसिटीसह विविध कलमांनुसार गुन्हे दाखल केले आहे.

## अभ्यासात हुशार, कुठलं व्यसन नाही ; पवई आयआयटीत विद्यार्थ्याच्या मृत्यूने शिक्षक हळहळले

**मुंबई :** नऊ मजली वसतिगृहाच्या गच्चीवरून पडून नमन अग्रवाल या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री पवई आयआयटीमध्ये घडली. हा अपघात होता की नमन याने आत्महत्या केली की, अन्य काही कारण आहे, याचा तपास पवई पोलिस करीत आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री दीडच्या सुमारास आयआयटीच्या सुरक्षा रक्षकांनी मोठा आवाज ऐकला. ते आवाजाच्या दिशेने धावले तेव्हा नमन रक्ताच्या थारोळ्यात असल्याचे त्यांना आढळले. गंभीर जखमी झालेल्या नमनला सुरक्षा रक्षकांनी घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी दाखल करण्यापूर्वीच नमन याला मृत घोषित केले. त्याचा मृतदेह पोलिसांनी शवविच्छेदनासाठी पाठविला. नमन मूळचा राजस्थानचा रहिवासी असून, या घटनेबाबत त्याच्या



कुटुंबीयांना कळविण्यात आले आहे, असे पोलिसांनी सांगितले.बी. टेकच्या (सिव्हिल इंजिनिअरिंग) दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी असलेला नमन हा आयआयटी संकुलातील वसतिगृह क्रमांक ४ या नऊ मजली इमारतीच्या गच्चीवरून खाली पडला. नमन हा वसतिगृह क्रमांक ३ मध्ये वास्तव्य करत होता. मध्यरात्रीनंतर तो वसतिगृह क्रमांक ४ येथे कशासाठी गेला? त्याच्यासोबत कोण होते? याची चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.आयआयटी मुंबईत बी-टेकच्या दुसऱ्या वर्षाला असलेल्या नमन अग्रवाल याच्या मृत्यूमुळे त्याच्या मित्रांसह आयआयटीच्या संचालकांनाही धक्का बसला आहे.

## दुचाकीस्वार कारखाली अडकला तरीही गाडी थांबवलीच नाही ; तब्बल २ किलोमीटर फरपटत नेलं, एकाचा करुण अंत...

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर परिसरात शुक्रवारी (३१ जानेवारी) सायंकाळच्या सुमारास घडलेल्या भीषण अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. माऊली हॉटेलजवळ झालेल्या या अपघातात भरधाव प्रवासी वाहतूक कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर दुचाकीस्वाराला कारसोबत तब्बल दीड ते दोन किलोमीटर अंतरापर्यंत फरपटत नेण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर आली असून, या थरारक घटनेचा उऊढत व्हिडिओही समोर आला आहे.प्राथमिक माहितीनुसार, श्रीवर्धन तालुक्यातील कर्लास गावातील मोहम्मद हनीफ अरजबेगी हे पत्नी सिमीन यांच्यासह चक ०६ उड ६७२३ क्रमांकाच्या




दुचाकीवरून प्रवास करत होते. दिवेआगर येथील माऊली हॉटेल परिसरात चक १२ थद २१८६ क्रमांकाच्या भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला मागून जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की मोहम्मद हनीफ अरजबेगी हे कारखाली अडकले गेले आणि कारचालकाने गाडी न थांबवता त्यांना बोरली पंचतन येथील स्मशान रोडपर्यंत फरपटत नेले.या अपघातात मोहम्मद हनीफ अरजबेगी यांचा जागीच मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात असून, त्यांची पत्नी सिमीन या गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी मुंबईला हलवण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. रस्त्यावरील राक्षसी वेगामुळे निष्पापांचा बळी जात असल्याने संतप्त नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.विशेष म्हणजे, याच ठिकाणी यापूर्वीही अनेक अपघात घडले असल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे. मात्र वारंवार होणाऱ्या अपघातांनंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात न आल्याचा आरोप होत आहे. स्पीड ब्रेकर, सूचना फलक, तसेच वाहतूक नियंत्रणाची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. दरम्यान, अपघातास कारणीभूत ठरलेल्या कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास श्रीवर्धन पोलीस करत आहेत. या भीषण अपघातामुळे दिवेआगर व परिसरात शोककळा पसरली असून, नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

# चॅम्पियन RCB वर पैशांचा पाऊस, फायनल गमावूनही जेमीचा संघही मालामाल..!

**वडोदरा/वृत्तसंस्था :** वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात २०२६ चा रोमांचक अंतिम सामना रंगला. आरसीबीने प्रभावी कामगिरी करत दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले. कर्णधार Smriti Mandhana नेतृत्वाखाली, संघाने २०२४ च्या हंगामातील यशाची पुनरावृत्ती केली आणि सर्वाधिक विजेतेपदे मिळवणाऱ्या संघांच्या यादीत मुंबई इंडियन्सनंतर आता आरसीबीने आपले स्थान निर्माण केले.या विजयासाठी Royal Challengers Bengluru कोट्याधीश रुपये दिले गेले तर दिल्लीवरही पैशांचा पाऊस पडला.



आरसीबीला ६ कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले. उपविजेत्या दिल्ली कॅपिटल्सलाही ३ कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले. ही बक्षीस रक्कम रचना डब्ल्यूपीएलच्या सुरुवातीपासूनच अस्तित्वात आहे. मुंबई इंडियन्सने दोनदा विजेतेपद जिंकले आहे, प्रत्येकी ६ कोटी रुपये मिळवले आहेत, तर आरसीबीने २०२४ च्या हंगामातही तेवढीच बक्षीस रक्कम जिंकली आहे. यावेळी, आरसीबीच्या सातत्यपूर्ण, मजबूत तयारी आणि टीम वर्कमुळे त्यांना विजेतेपद मिळाले.याशिवाय, स्पर्धेतील सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूला ऑरेंज कॅप, सर्वाधिक विकेट घेणाऱ्या खेळाडूला पर्पल कॅप आणि स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू यांना प्रत्येकी ५ लाख मिळाले. शिवाय, सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडू आणि सर्वोत्तम स्ट्राईक रेट असलेल्या खेळाडूलाही प्रत्येकी ५ लाख मिळाले.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी हा सामना खास होता. प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने २०३ धावा केल्या आणि आरसीबीला २०४ धावांचे लक्ष्य ठेवले. इतके मोठे लक्ष्य केवळ अंतिम सामन्यातच नव्हे तर महिला प्रीमियर लीगमध्येही कधीच पाठलाग केले गेले नव्हते. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १९.४ षटकांत केवळ ४ गडी गमावून लक्ष्य गाठत जेतेपद जिंकण्यासाठी विक्रमी धावांचा पाठलाग पूर्ण केला आणि तब्बल दुसऱ्यांदा ही ट्रॉफी जिंकली. दिल्ली आतापर्यंत चार वेळा फायनलमध्ये पोहोचली आहे पण दरवर्षी दिल्लीच्या पदरी निराशाच आल्याची दिसत आहे. स्मृतीने आजच्या सामन्यात सर्वाधिक धावा केल्या. स्मृतीने आज ८७ धावा केल्या आणि संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. तर आरसीबीकडून जॉर्जिया वॉलने ७९ धावा केल्या.

## अन तिथेच फिरला सामना' ; फायनल जिंकल्यावर स्मृती मानधनाकडून 'त्या' एकट्या खेळाडूला श्रेय

**वडोदरा/वृत्तसंस्था :** वुमन्स प्रीमियर लीग २०२६ सीजनच्या फायनल सामन्यामध्ये आरसीबीने दिल्ली कॅपिटल्स संघाचा पराभव करत विजेतेपदावर नाव कोरले. या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या दिल्ली संघाने २० ओव्हरमध्ये २०४-४ धावा केल्या होत्या. तर या धावांचा पाठलाग करताना आरसीबी संघाने सहा विकेट आणि दोन चेंडू राखून विजय मिळवला. आरसीबीने दुसऱ्यांदा ट्रॉफी नावावर केली आहे. तर दुसरीकडे दिल्ली सलग चौथ्यांदा फायनल हरली. सामना संपवल्यावर कर्धणार स्मृती मानधनाने एकट्या खेळाडूला विजयाचे श्रेय दिले. कोण आणि तिने काय कामगिरी केलेली, जाणून घ्या.आरसीबीचे फॅन्स जगातील बेस्ट असून कुठेही सामना असला तरी त्यांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळतो. तीन वर्षांमध्ये तीन विजेतेपद जिंकले, आम्हीसुद्धा जे काही आहे ते चाहत्यांसाठीच करतो. २०० धावांचा पाठलाग करताना आधीच वाटलं होतं की हे पिच फलंदाजीसाठी चांगलं आहे. मला वाटतं की शेवटच्या चार ओव्हरमध्ये आम्ही चांगली बॉलिंग करत परिस्थीत व्यवस्थित हाताळली, त्याचे श्रेय लॉरेन बेल हिला जाते. कारण एका सामन्यात जर ४०० पेक्षा अधिक धावा होतात आणि तिने चार ओव्हरमध्ये २०-२२ धावा देते म्हणजे तिचा स्पेल मॅच जिंकवणारा होता, असं म्हणत स्मृती मानधनाने विजयाचे श्रेय तिला दिले. स्मृतीने स्वत: मोठे योगदान दिले, ४१ बॉलमध्ये तिने ८७ धावा करत सामना एका बाजूने झुकवला होता.या सीजनमध्ये कोणत्या तीन खेळाडूंनी



प्रभावित केलं? यावर बोलताना स्मृतीने तिन नावे घेतलीत. तसं पाहायला गेलं तर आम्ही जो काही प्लॅन केला त्यानुसार सर्वांनीच प्रभावित केले. पण मी दोन-तीन खेळाडूंची नावे घेईल. प्रत्यूषा कुमार ही अशी मुलगी होती जिला खेळण्याची संधी मिळाली नाही, ती प्रत्येक सरवा सत्रामध्ये भाग घ्यायची आणि सर्वांना पाणी द्यायची. त्यानंतर गौतमी आणि प्रेमा यांनी ज्या प्रकारे संघात काम केले त्याबद्दल मी त्यांची आभारी राहिल, असंही स्मृती म्हणाली.दरम्यान, या सामन्यामध्ये स्मृतीने ८७ धावा करत सामना खेचला होता. परंतु शेवटच्या वेळी तिने विकेट गमावली. त्यानंतर आलेल्या राधाने दोन चौकार मारत सामना जिंकवला. दिल्लीने सोडलेला एक कॅच त्यांना चांगलाच महागात पडला.

## आरसीबी चॅम्पियन बनताच स्मृतीला मिळाली मोठी गुड न्यूज

**वडोदरा :** रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये महिला प्रीमियर लीग २०२६ चा फायनल सामन्याचा थरार रंगला. वडोदरामधील कोटंबी स्टेडियममध्ये हा सामना रंगला. बेंगळुरुला दुसरी ट्रॉफी जिंकण्याचे यश मिळाले. या सामन्यात सर्वाधिक धावा या कॅप्टन डीळींळ चरपवहरपर केल्या. स्मृतीने फक्त सर्वाधिक धावा करुन संघाला जिंकवलंच नाही तर एक रेकॉर्डब्रेक कामगिरीही केली.या हंगामात स्मृतीने संघाचे नेतृत्त्व अतिशय यशस्वीपणे पार पाडले. स्मृतीने वैयक्तिकरित्याही चांगली कामगिरी केली. स्मृतीने महिला प्रीमियर लीगच्या यंदाच्या हंगमात सर्वाधिक धावा केल्या. त्यामुळेच स्मृतीला यासाठी ऑरेंज कॅप मिळाली. आरसीबी कर्णधार मानधनाने २०२६ च्या वर्ल्ड प्रीमियर लीगमध्ये नऊ सामने खेळले आणि नऊ डावांमध्ये ५३.८५ च्या सरासरीने ३७७ धावा केल्या.स्मृतीने या हंगमात १५३.२५ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली. तिने तीन अर्धशतके



झळकावली. तिचा सर्वोच्च धावसंख्या ९६ होती. तिच्या पाठोपाठ मुंबई इंडियन्स कर्णधार हरमनप्रीत कौरचा नंबर आहे. हरमनने ३४२ धावा केल्या आहेत. अंतिम सामन्यापूर्वी स्मृती थझङ २०२६ हंगामात सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तिसऱ्या क्रमांकावर होती, परंतु अंतिम सामन्यात ८७ धावांच्या खेळीमुळे ती पहिल्या क्रमांकावर पोहोचण्यात यशस्वी झाली. स्मृती मानधनाने चौथ्या हंगामात एकूण ९ सामने खेळले आणि ५३.८५ च्या उत्कृष्ट सरासरीने ३७७ धावा केल्या, ज्यामध्ये तिने तीन अर्धशतकी खेळी देखील केल्या. यासह, ती ऑरेंज कॅप जिंकण्यात देखील यशस्वी झाली.

## ड्रेसिंग रूममधील वातावरण...गंभीर आल्यानंतर संघात नेमकं काय घडलं ? वर्ल्ड कपपूर्वी सूर्याचं विधान चर्चेत

**मुंबई/वृत्तसंस्था :** ७ फेब्रुवारी रोजी T20 World Cup 2026 च्या मोहिमेला आता सुरुवात होणार आहे. गतविजेता टीम इंडिया मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाविरुद्ध त्यांचा पहिला गट सामना खेळेल. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल. कर्णधार Suryakumar Yadav आणि मुख्य प्रशिक्षक Gautam Gambhir ट्रॉफी उंचावण्याचे ध्येय ठेवतील. संघ गेल्या काही काळापासून सातत्याने चांगली कामगिरी करत आहे. आता सूर्या गंभीरबद्दल काय म्हणाला ते पाहा...गंभीरच्या आगमनानंतर ड्रेसिंग रूममधील बदलांबद्दल सूर्यकुमार यादवने उघडपणे सांगितले की, 'गंभीरच्या आगमनानंतर संघात लक्षणीय बदल झाले आहेत. ड्रेसिंग रूममधील वातावरण हलके झाले आहे. आता, वैयक्तिक कामगिरी किंवा टप्पे गाठण्यापेक्षा संघाच्या गरजांकडे अधिक लक्ष दिले जाते. अलिकडच्या एका डावात इशान किशन ९० च्या पुढे होता, परंतु त्यावेळी संघाला जलद धावांची आवश्यकता असल्याने त्याने नॉनस्टॉप षटकार मारून शतक पूर्ण केले. मैदानावरील



दोन्ही फलंदाजांना त्यांच्या शैली आणि परिस्थितीनुसार खेळण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे.'२०२४ च्या टी-२० विश्वचषकानंतर गौतम गंभीर टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक बनले. तेव्हापासून टीम इंडियाने टी२० स्वरूपात वर्चस्व गाजवले आहे. या काळात भारतीय संघाने ४१ टी-२० सामने खेळले आहेत, त्यापैकी ३३ सामने जिंकले आहेत आणि फक्त ६ सामने गमावले आहेत. भारताने त्यांच्या ८५% सामने जिंकले आहेत, जे इतर सर्व संघांपेक्षा सर्वाधिक आहेत. इतर कोणत्याही संघाने ३० विजयांचा टप्पा गाठलेला नाही.गौतम गंभीरच्या प्रशिक्षणाखाली भारताने २०२५ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. आता, त्यांचे लक्ष टी२० विश्वचषकावर आहे. या स्पर्धेत भारत अमेरिका, नामिबिया, पाकिस्तान आणि नेदरलँड्ससह गट अ मध्ये आहे. अमेरिकेविरुद्धच्या पहिल्या सामन्यामुळे संघाला चांगली सुरुवात करण्याची संधी मिळेल. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली युवा आणि अनुभवाचे संतुलन संघाला बळकटी देत आहे. भारत आणि श्रीलंका या दोन्ही देशात टी- २० विश्वचषकाचे सामने खेळवला जाणार आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दिवाळखोर? आर्थिक अडचणींमुळे शाळांमध्ये डान्स करण्याची वेळ! मॅनेजरनेच सांगितले सत्य

**मुंबई :** गेल्या काही काळापासून सोशल मीडियावर गोविंदाबद्दल अनेक गोष्टींची चर्चा सुरू आहे. त्याच्या वैवाहिक जीवनात अडचणी असल्याचे म्हटले जात आहे. त्याच्या पत्नीनेही त्याच्याबद्दल बरेच खुलासे केले होते. त्यामुळे शंकेला तिथेच वाट फुटली होती. अशातच आता अभिनेत्याच्या दिवाळखोरीच्या अफवाही समोर येऊ लागल्या आहेत.अलिकडेच, गोविंदा खाजगी कार्यक्रमांमध्ये आणि एका शाळेच्या कार्यक्रमात डान्स करताना दिसला होता. तेव्हा तो दिवाळखोर झाला आहे आणि त्याला पैशांची गरज असल्याने तो अशा कार्यक्रमांमध्ये परफॉर्म करत असल्याच्या अफवा पसरल्या होत्या. गोविंदाचे मॅनेजर शशी सिन्हा यांनी आता यावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी गोविंदाच्या दिवाळखोरीच्या गोष्टी या अफवा असल्याचे म्हटले आहे. त्यांनी त्या काळाची आठवणही करून दिली जेव्हा अभिनेत्याला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला आणि त्याचे घर



गहाण ठेवावे लागले. पण त्यानंतर त्याने ते कर्ज फेडले आहे.अलीकडेच, गोविंदाचा एक व्हिडिओ समोर आला आहे ज्यामध्ये तो उत्तर प्रदेशात एका साध्या टॅक्सीमध्ये जाताना दिसलेला. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे, ज्यामुळे युझर्सनी याला गोविंदाचे हालाखीचे दिवस सुरू असल्याचे म्हटले. एकेकाळी बीएम डब्ल्यू आणि मर्सिडीज-बेंझ चालवणारा स्टार आता सामान्य गाड्या वापरत आहे अशाप्रकारच्या कमेंट त्या व्हिडिओवर येऊ लागल्या. गोविंदाचा मॅनेजर शशी सिन्हा यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. गोविंदाच्या मॅनेजरने सांगितले, 'त्याच्याकडे अनेक गाड्या आहेत, पण तो दिवाळखोर नाही.' शशी सिन्हा म्हणाले की, गोविंदाचा खाजगी कार्यक्रम आणि शाळांमध्ये परफॉर्म करणे आणि कारमधून त्याचा साधा प्रवास याचा आर्थिक अडचणींशी काहीही संबंध नाही. एएनआयला दिलेल्या मुलाखतीत मॅनेजरने सांगितले, 'गोविंदाकडे फक्त एक नाही तर अनेक गाड्या आहेत. तो दिवाळखोर आहे आणि पैशांसाठी काम करतो असे म्हणणे पूर्णपणे मूर्खपणाचे आहे. परफॉर्मन्स करणे हा त्याचा व्यवसाय आहे. याचा अर्थ असा नाही की तो दिवाळखोर आहे. त्या वेळी विमानतळावर खाजगी वाहनांना परवानगी नव्हती. जर तो त्याच्या कुटुंबाची काळजी घेत नसता तर कोण घेत? तो अजूनही त्याच्या पत्नी आणि मुलांची काळजी घेतो.'शशी सिन्हा म्हणाले की गोविंदाने गेल्या काही वर्षांत एकही चित्रपट केला नसला तरी, त्याला केवळ कार्यक्रम आणि डान्स परफॉर्मन्ससाठीच नव्हे तर चित्रपटांसाठीही मोठी मागणी आहे. ते म्हणाले, 'मी याचा साक्षीदार आहे की त्याने कोट्यवधी रुपयांच्या ऑफर नाकारल्या आहेत. पटकथा किंवा काही गोष्टी आवडत नाही या गोष्टी ठीक आहेत. परंतु तो पहिला अभिनेता आहे ज्याच्याकडे सध्या हिट चित्रपट नाही, तरीही मोठे निर्माते आणि अभिनेते त्याच्या मागे लागले आहेत. याचा अर्थ असा नाही की त्याने काम करणे थांबवले आहे. तुम्हाला लवकरच एक मोठी घोषणा ऐकायला मिळेल. शशी सिन्हा यांनी पुन्हा त्या काळाबद्दल सांगितले जेव्हा गोविंदाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला होता. त्यांनी यासाठी अभिनेत्याच्या उदारतेला आणि चुकीच्या मॅनेजमेंटला जबाबदार धरले. शशी म्हणाले, 'एक काळ असा होता जेव्हा गोविंदाने त्याच्या मुदत ठेवीतून पैसे काढले, अधिक पैसे जोडले आणि ते इतरांना मदत करण्यासाठी वापरले. परंतु परिस्थिती इतकी बिकट झाली की त्याला त्याचे घर गहाण ठेवावे लागले. अलीकडे, तो कार्यक्रमांमध्ये जाऊ लागला आणि तो कर्ज फेडण्यासाठी सर्वत्र नाचला असे म्हटले जाऊ लागले. आम्ही याबद्दल कधीही चर्चा केली नाही आणि त्याने कधीही कोणाकडे पैसे मागितले नाहीत.



## गेमच्या नादापायी तीन बहिणींनी आयुष्य संपल्यानंतर सोनू सूदचं आवाहन

**मुंबई :** ऑनलाइन गेमच्या व्यसनामुळं अनेकदा आर्थिक फटका बसल्याचं समोर आलं आहे. पण आता एक भयंकर अशा घटनेनं देश हादरला आहे. कोरियन गेमच्या व्यसनापायी तीन बहिणींनी एकाचवळी आत्म हत्या केल्याचा उत्तर प्रदेशातील गाझियाबादमधील साहिबाबाद परिसरातील भारत सिटी इथं बुधवारी पहाटे घडल्याचं समोर आला आहे. नवव्या मजल्यावरील घराच्या बाल्कनीतून उडी मारल्यानं १६ वर्षीय निशिका, १४ वर्षीय प्राची आणि १२ वर्षांच्या पाखी यांचा मृत्यू झालाय. यानंतर अभिनेता सोनू सूद यानं पोस्ट शेअर करत या सगळ्यावर भाष्य केलं आहे.सोनू सूदनं पोस्ट तसंच व्हिडिओ शेअर करत या घटेनबद्दल बोलताना काळजी व्यक्त केली आहेघटनेवर प्रतिक्रिया देताना सोनू सूदनं इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यात त्यानं म्हटलंय की, आज गाझियाबादमध्ये तीन मुलींनी जीव गमावला. हे मृत्यू गरिबीमुळं किंवा हिंसेमुळं झाले नाहीत, तर ऑनलाइन गेमिंग आणि डिजिटल व्यसनाच्या अदृश्य दबावामुळं झालेत. मी आधीही सांगितलंय आणि पुन्हा सांगेन - १६ वर्षांखालील मुलांसाठी शिक्षण वगळता सोशल मीडिया आणि ऑनलाइन गेमिंगवर कडक निर्बंध असायला हवेत.'सोनूनं पालकांना उद्देशून म्हटलं की, 'म ुलांच्या बालपणाला अल्गोरिदमची नाही, तर योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. त्यांना सतत समोर असणाऱ्या 'स्क्रीन'ची नाही, तर तुमच्या प्रेमाची आणि सोबतीची गरज आहे. आपण आपल्या आयुष्यात इतके व्यस्त झालो आहोत की, घरातला तिसरा सदस्य 'मोबाईल' बनला आहे, हे आपल्या लक्षातच येत नाही.'त्यानं म्हटलं की, घरात मुलांशी संवाद साधा, त्यांच्या मनात काय चाललंय आहे ते समजून घ्या. तंत्रज्ञान शिक्षणासाठी आवश्यक आहे, पण त्याचं व्यसन जीवघेणं ठरू शकतं, हे दिसून आलंय.यासाठी कायदा करण्याची मागणीही त्यानं केली आहे.



## म्हणून 'तारीख नाही' असं सांगितलं जातं पण..

### प्रियंदर्शिनी नं सांगितलं कलाकारांचं एक खास सिक्रेट

**मुंबई :** लग्नाचा शॉट' या सिनेमाची गोष्ट केवळ या दोन पात्रांभोवती फिरते. मराठीत अशा प्रकारच्या सिनेमाचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'मुंबई-पुणे-मुंबई. अशा धाटणीच्या सिनेमात काम करण्याची माझी मनापासून इच्छा होती. ती आता 'लग्नाचा शॉट'च्या निमित्तानं पूर्ण झाली. त्यातील मी आणि अभिजीत आमकर या आमच्या जोडीला आणि सिनेमाचा ट्रेलरला प्रेक्षकांकडून मिळणारा प्रतिसादही खूप चांगला आहे, याचा मला विशेष आनंद वाटतो. लग्न म्हणजे आनंद, गडबड, नात्यांची गुंफण आणि अनेक अनपेक्षित क्षणांचा संगम, हाच संगम प्रेक्षकांना सिनेमात पाहायला मिळणार आहे. लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय असतो. पण कधी कधी या आनंदाच्या क्षणांमध्ये काही अनपेक्षित गोष्टी घडतात. 'लग्नाचा शॉट'ची कथा अशाच अनपेक्षित प्रसंगांमधून आकाराला आली आहे. या चित्रपटातून केवळ मनोरंजन होणार नसून नात्यांमधील गोंधळ, गैरसमज आणि त्या परिस्थितीतून चाहेर पडण्याचा प्रवास बघायला मिळणार आहे.खरं सांगायचं तर, अनेकदा बोलायचं म्हणून बोललं जातं. कधी कधी दिग्दर्शकांना भेटायला वेळ मिळत नाही; म्हणून 'तारीख नाही' असं सांगितलं जातं पण कधी कधी खरंच वेळ नसतो. सिनेमांचं प्रमोशन काही तासांचं असलं, तरी त्यात पूर्ण दिवस जातो. दोन माध्यमांमध्ये काम करत असल्यामुळे वेळेचा गोंधळ होतो. कधी महिनाभर काहीच नसतं, तर कधी सतत धावपळ असते; आज एका शहरात, तर उद्या दुसऱ्या शहरात. त्यामुळे कधी कधी चुकीच्या तारखा दिल्या जातात किंवा एकाच दिवशी दोन जणांना वेळ दिलेला असतो आणि मग अडचण निर्माण होते.नाही माणणं अनुभवातूनच शिकता येतं. सुरुवातीला आपण फक्त 'हो' म्हणत असतो; काम कुठलंही असो. पण कलाकार म्हणून जसजशी ओळख होते, तसतसं लक्षात येतं, की माझा प्रेक्षकवर्ग निराश होता कामा नये. त्यांना काहीतरी नवीन देण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. ज्या प्रेक्षकांनी माझं काम एकाच माध्यमात पाहिलं आहे, त्यांनाही वाटावं की 'हिचं काहीतरी वेगळं येतंय' असं काहीतरी वेगळं करून बघितलं पाहिजे. त्यासाठी 'नाही' म्हणणं गरजेचं आहे. ज्या गोष्टीवर स्वतःचा विश्वास नाही, ती गोष्ट करू नये, असं मला वाटतं.मी डबिंगही करते, त्यामुळे त्या क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये अशी भीती आहे, की काहीच वर्षांत काम मिळणं बंद होईल, पण मला वाटतं, की एआय म्हणजेच कृत्रिम प्रज्ञा माणसांना कधीच पूर्णपणे वगळू शकत नाही. नवीन काही आलं, जुनं संपणार असंच नेहमी वाटतं. सिनेमा आला तेव्हा नाटक बंद होईल असं वाटलं होतं, पण तसं झालं नाही, ओटीटी आलं, तेव्हा वाटलं सिनेमागृहं बंद होतील, पण आज उलट चित्र आहे. लोक पुन्हा सिनेमागृहात गर्दी करत आहेत. कारण शेवटी माणसाला माणसाचाच अनुभव हवा असतो.आपल्या सिनेक्षेत्रातले ज्येष्ठ, अनुभवी कलाकार आमच्या कामावर नेहमी लक्ष ठेवून असतात.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आईला निरोप देतानाही जपले रुग्णसेवेचे व्रत...

## नेत्रदान चळवळीचे प्रणेते जगदीश बाहेकरांचा आदर्श; शोकसागरातही सामाजिक भान

**जनसंचलन/ चिखली**

आईच्या निधनाचे अतीव दुःख उराशी असतानाही, रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद जपत बाहेकर कुटुंबीयांनी एक हृदयस्पर्शी आदर्श समाजासमोर ठेवला आहे. तालुक्यातील किन्होळा येथील रहिवासी मनकर्णाबाई शेषराव बाहेकर (वय ८४) यांचे ६ फेब्रुवारी रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. या दुःखद प्रसंगी त्यांचे पुत्र जगदीश आणि भास्कर बाहेकर यांनी मातोश्रींचे नेत्रदान करून दोन अंधांच्या जीवनात प्रकाशाची नवी पहाट आणण्याचा महान निर्णय घेतला. विशेष म्हणजे, जगदीश बाहेकर यांनी आपल्या सेवाकाळात वाशिम जिल्ह्यात नेत्रदान चळवळ उभी करून राज्याच्या पटलावर कौतुकास्पद कामगिरी बजावली होती. त्यांच्याच प्रयत्नांमुळे एकेकाळी वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयाची ख्याती दृष्टी देणारे रुग्णालय म्हणून संपूर्ण पूर्व विदर्भात निर्माण झाली होती. सेवानिवृत्त नेत्र चिकित्सा अधिकारी असलेल्या बाहेकर यांनी आपली ही जनसेवेची कामगिरी निवृत्तीनंतरही अविरत सुरू ठेवली असून, आज स्वतःच्या आईच्या निधनानंतरही त्यांनी हे व्रत तितक्याच निष्ठेने जपले. मनकर्णाबाई बाहेकर यांच्या निधनानंतर अंत्यसंस्कार करण्यापूर्वी बाहेकर बंधूंनी नेत्रदानाचा संकल्प केला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बिराजदार आणि जिल्हा अंधत्व निवारण कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. रवी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.



**मृत्यूनंतरही आपल्या मातोश्रींचे डोळे या जगाकडे पाहत राहतील, या भावनेने बाहेकर कुटुंबीयांनी घेतलेल्या या धाडसी निर्णयाचे किन्होळा परिसरात आणि आरोग्य क्षेत्रातून मोठे कौतुक होत आहे. एका सेवाभावी अधिकाऱ्याने स्वतः च्या दुःखावर मात करून समाजाला दिलेला हा संदेश खऱ्या अर्थाने माणुसकीची ज्योत प्रज्वलित करणारा ठरला आहे.**

यावेळी नेत्र शल्य चिकित्सक डॉ. अमोल उगले, नेत्र चिकित्सा अधिकारी राजेंद्र देवकर, प्रवीण सोलंकी आणि समुपदेशक योगेश सिरसाठ यांनी तातडीने कार्यवाही केली.

# यु .जी.सी.ची जातीभेदभाव विरोधी नियमावली कायम करा :- अम्रपाल वाघमारे

**जनसंचलन/बुलढाणा**

देशातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये होणारा जातीभेदभाव रोखण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यु. जी.सी) लागू केलेली नवीन नियमावली केवळ कागदावर न राहता, तिचे कायद्यात रूपांतर करून तिची कायमस्वरूपी अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी आज भारतीय समता संघटनेच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना निवेदन सादर करण्यात आले. उच्च शिक्षण संस्थांमध्ये वंचित आणि शोषित घटकांतील विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सन्मानकारक वातावरण मिळावे, यासाठी ने नुकतीच नवी नियमावली जाहीर केली आहे. या निर्णयाचे स्वागत करतानाच, त्याची अंमलबजावणी अधिक कठोरपणे व्हावी, अशी मागणी या निवेदनातून अम्रपाल वाघमारे यांनी केली आहे.निवेदनातील प्रमुख मागण्याः कायदेशीर दर्जाः च्या नियमावलीचे रूपांतर कडक कायद्यात करण्यात यावे. कठोर कारवाईः नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शिक्षण संस्थांवर फौजदारी कारवाईची तरतूद असावी. संवैधानिक अंमलबजावणीः



संविधानातील कलम १४, १५ आणि १७ नुसार समता प्रस्थापित करण्यासाठी शिक्षण संस्थांमध्ये झिरो टॉलरन्स धोरण राबवावे. आत्महत्या रोखण्यासाठी उपायः शैक्षणिक क्षेत्रातील दुजाभावामुळे होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांना आळा घालण्यासाठी विशेष यंत्रणा उभी करावी. शिक्षण संस्था या समाजाला दिशा देणाऱ्या जागा आहेत. तिथे होणारा भेदभाव हा लोकशाहीसाठी घातक आहे. संविधानाच्या भावनेशी सुसंगत असलेल्या या नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित होईल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. आमोल भाऊ थोरात ,जय इंगळे ,विनोद जाधव पीके शेजोळ ,आमोल भाऊ इंगळे ,विशाल हीवरकर , इत्यादी हजर होते .

# २१ महिन्यांचे वेतन थकीत; १०२ चालकांचा आत्मदहनाचा इशारा!

**जनसंचलन/बुलडाणा**

१०२ देऊळगाव राजा मागील २१ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने बुलढाणा जिल्ह्यातील रुग्णवाहिकांच्या कंत्राटी चालकांतर उपासमारीची वेळ आली असून, त्यांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे. थकीत वेतन तातडीने देण्यात यावे, या मागणीसाठी चालकांनी मुख्यमंत्री सचिवालय व राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे जिल्हा आरोग्य विभागाच्या माध्यमातून ६ फेब्रुवारी निवेदन सादर केले आहे. बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालय, तसेच व ग्रामीण रुग्णालयांमध्ये कार्यरत चालकांना दीर्घकाळ वेतन न मिळाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापूर्वी ११ जुलै २०२५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक उपसंचालकांकडे (आरोग्य सेवा, अकोला मंडळ) निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणानंतर १५ दिवसांत वेतन देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र सात सदर निवेदन देताना पदाधिकारी. महिन्यांनंतरही वेतन मिळाले नसल्याचे चालकांचे म्हणणे आहे. दिवसांत वेतन देण्याचे अश्वासन शासनाने पाळले नाही. वेतन न देता काही चालकांना कामावरून कमी करण्यात आल्याने त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. मुलांचे शिक्षण, घरखर्च व औषधोपचार करणे कठीण झाल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. ग्रामीण रुग्णालय लोणार येथील चालक गजानन दत्तराव देशमुख यांनी मंत्रालयात दिलेले आत्मदहनाचे निवेदन मागे घेण्यास भाग पाडल्याचा



आरोपही करण्यात आला आहे. सदर कर्मचाऱ्यांचे २१ महिन्यांचे थकीत वेतन तातडीने देणे, कामावरून कमी केलेल्या चालकांना पुन्हा सेवेत घेणे, दर महिन्याचे वेतन पाच तारखेपूर्वी देणे व बंद रुग्णवाहिका सुरू करणे या प्रमुख मागण्या चालकांनी केल्या आहेत.

# दुचाकी चोरीप्रकरणी मुख्य आरोपीसह तिघांना अटक

**जनसंचलन/ संग्रामपूर**

दुचाकी चोरी करून ती गहाण ठेवणाऱ्या टोळीचा तामगाव पोलिसांनी पर्दाफाश केला असून, ६ फेब्रुवारी रोजी मुख्य आरोपीसह तिघांना अटक करण्यात आली. शुक्रवारी कारवाईत चोरलेली दुचाकीही हस्तगत केली. १९ जानेवारी रोजी रात्री वकाना येथील बद्रीनारायण महादेव ठोंबरे यांची एमएच-२८-बीटी-३५०९ क्रमांकाची दुचाकी घरासमोरून अज्ञात चोरट्यांनी लंपास केली होती. सकाळी दुचाकी आढळून न आल्याने ठोंबरे यांनी तत्काळ तामगाव पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध तक्रार दाखल केली होती. तक्रारीनंतर तामगाव पोलिसांनी तपास सुरू केला. अवघ्या १५ दिवसांत पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत आरोपींचा माग काढला. तपासात ही दुचाकी अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड येथे



चोरून गहाण ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलिस हवालदार विष्णू कोल्हे यांनी इरशाद खान उर्फ फरदीन खान, शेख साजिद (दोघे रा. जळगाव जामोद), शेख जाकीर उर्फ शेख जहबाज (रा. हिवरखेड, ता. तेल्हारा) या तिघांना अटक केली. चोरीची दुचाकी हस्तगत केली असून तिन्ही आरोपी सध्या एक दिवसाच्या पोलिस कोठडीत आहे

# अकोला हायवेवर भीषण अपघात; भरधाव ट्रकखाली दोन गायी ठार, एक गंभीर जखमी!



जनसंचलन/ खामगाव

अकोला हायवे रोडवर भरधाव ट्रकच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या भीषण अपघातात दोन गायींचा जागीच मृत्यू झाला तर एक गाय गंभीर जखमी झाली. ही हृदयद्रावक घटना ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजेच्या सुमारास घडली. अकोल्याकडे जात असलेल्या ट्रक चालकाने वेगावर नियंत्रण न ठेवल्याने रस्त्यावर असलेल्या तीन गायींना चिरडत पुढे पोबारा केल्याची माहिती समोर आली आहे. अपघात इतका भीषण होता की एका गायीचा अक्षरशः चुराडा झाला होता. विशेष म्हणजे, बराच वेळ गायी रस्त्यावरच पडून असूनही ये-जा करणाऱ्या वाहनचालकांनी मदतीसाठी पुढाकार घेतला नाही, ही बाब संतापजनक ठरली आहे. घटनेची माहिती मिळताच एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशनचे सुरजभैय्या यादव, अमोल तायडे, मनोज यादव व सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मृत गायी बाजूला केल्या तसेच जखमी गायीला सुरक्षितस्थळी हलवले. गौ धारक ओबीसी नेते गणेश चौकसे यांनाही याबाबत कळवण्यात आले असून जखमी गायीवर उपचार सुरू असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकातून देण्यात आली आहे.

# चिखलीच्या मीरा हॉटेलसमोर थरारक अपघात; एक ठार, एकाची मृत्यूशी झुंज!



जनसंचलन/ चिखली

खामगाव-जालना हायवेवरील मीरा हॉटेलसमोर काल रात्री सुमारे ८:३० वाजेच्या दरम्यान झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी झाला. सुरा सरंबा ता. देऊळगाव राजा येथील स्वप्नील दिनकर चेके (वय ३०) हे बुलढाणाहून आपल्या गावी परत जात असताना चिखली मधून अचानक एक दुचाकी हायवेवर आडवी आल्याने दोन दुचाकींची जोरदार धडक झाली. या अपघातात स्वप्नील चेके यांचा जागीच मृत्यू झाला, तर उत्तर प्रदेश येथील शंकर प्रसाद हे गंभीर जखमी झाले असून त्यांना जालन्याकडे हलविण्यात आले आहे. मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आला असून चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार भूषण गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कैलास चतरकर व ज्ञानेश्वर शिंदे पुढील तपास करत आहेत.

# चिखली पोलिसांचा कॅफेंवर धडक ॲक्शन; नियमभंग करणाऱ्यांना इशारा!




जनसंचलन/ चिखली

शहरात वाढत्या अवैध प्रकारांना आळा घालण्यासाठी चिखली पोलीस स्टेशनकडून आज (दि.०६ फेब्रुवारी २०२६) विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. ठाणेदार भूषण गावंडे यांच्या नेतृत्वात पारधी बाबा रोड तसेच काळे हॉस्पिटल परिसरातील विविध कॅफेवर अचानक धाड टाकून तपासणी करण्यात आली. या कारवाईदरम्यान नियमबाह्य वेळेत कॅफे सुरू ठेवू नयेत, तसेच कोणतेही बेकायदेशीर प्रकार आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा देत संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या. पोलिसांच्या या अचानक कारवाईमुळे कॅफे चालकांमध्ये एकच खळबळ उडाली असून, शहरात शिस्त राखण्यासाठी अशा मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. सदर मोहिमेत राजेंद्र काळे, विजय किटे, कडुबा मुंढे, अनिल वाघ, पंढरी मिसाळ, अजय इटावा, सागर सोनुने, मंजुषा चिंचोले व वृषाली खेडेकर यांनी सहभाग घेतला. नागरिकांनीही संशयास्पद हालचालींबाबत पोलिसांना तत्काळ माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा



**बचत करा रू. ५०० प्रती माह पासून..**

| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

**दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली**

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४